# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ४८-२३ दिनांक :- ०९/०२/२०२३

## १६,६०,०००/- रुपये किंमतीचा मॅफेड्रॉन (एम.डी.) नावाचा अंमली पदार्थ बाळगणा-या ईसमावर अंमली पदार्थ विरोधी कक्षाची कारवाई.

दिनांक ०७/०२/२०२३ रोजी मिरा-भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाचे अंतर्गत अमली पदार्थ विरोधी कक्षातील अधिकारी व अंमलदार हे आचोळे पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात गस्त करीत असताना कॅपीटल मॉल समोरील रेल्वे पटरीलगत असलेल्या रोडवर एक संशयित ईसम आढळुन आला. सदरवेळी त्यास ताब्यात घेण्याचा प्रयत्न करीत असताना तो पळु लागल्याने त्यास शिताफीने ताब्यात घेउन त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जात ८३ ग्रॅम वजनाचा व १६,६०,०००/- रु. किंमतीचा मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ विक्रीकरीता बाळगला असल्याचे निदर्शनास आले. नमुद इसमास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव हुसेन सलिम सय्यद रा. अलकापुरी रोड, नालासोपारा पुर्व असे सांगितले. नमुद आरोपीताविरुध्द आचोळे पोलीस ठाणेत गु.रजि. नं. II ८२/२०२३ अंमली पदार्थ कायदा कलम ८(क), २२ (क) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन त्यास अटक करण्यात आले आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पो. नि. अमर मराठे, स.पो.नि. विलास कुटे, पो. हवा. पाटील, टक्के, सपकाळ, आव्हाड, पो. अंम. यादव यांनी केली आहे.

-----०००-----